# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पीन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


---

## प्रेस नोट

दिनांक :- १२/०७/२०२४

### अवैध दारू तस्कर सिल्वासा येथील मुख्य डिलरला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सिल्वासा येथुन घेतले ताब्यात

---

दिनांक ०७/०७/२०२४ रोजी रात्रीचे सुमारास अवैधरित्या दारूची वाहतूक करना-या क्रेटा कारच्या चालकाने जाणीव पुर्वक जीवे ठार मारण्याचे उद्देशाने शासकीय वाहनास जोरात ठोस मारून पसार झाला होता. सदर घटनेत राज्य उत्पादन शुल्क कडील स्कॉर्पिओ वाहन हे रोडच्या बाजुला पलटी झाल्याने राज्य उत्पादन शुल्क कडील वाहन चालक हे मयत झाले होते. तसेच ३ अंमलदार यांना गंभीर मार लागल्याने ते उपचार घेत आहेत. सदरच्या घटने बाबत चांदवड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २७३/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम १०३(१), १०९, १३२, २३८, ३२४(४), १२१ (१), (२), ३(५),६१(२) सह मोटर वाहन का. क. १८३, १८४, १३४(अ),(ब)/१७७, ७९(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्याअनुशंगाने मा. पोलीस अधिक्षक सो, नाशिक ग्रामीण यांनी गंभीर दखल घेवून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने क्रेटा कार चालक देवीश कांतीलाल पटेल, वय-३७ वर्षे,रा.चिंचवाडा,ता.जि.वलसाड, गुजराथ व त्याचा साथीदार अशपाक अली मोहम्मद शेख, वय २२, रा.फलॅट नं १०३, युनिक अपार्टमेंट, दर्गारोड, नवसारी, ता.जि. नवसारी, गुजरात व गुन्हयात वापरलेली क्रेटा ही दमन येथुन पथकाने ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे. मा. पोलीस अधिक्षक सो, नाशिक ग्रामीण यांनी मुख्य डिलर यास अटक करणेकामी सुचना देवुन पथके रवाना केली.

त्यानुसार गुन्हयातील मुख्य डिलर राहुल ज्योती सहाणी,वय-४४,रा.नारोली रोड, सिल्वासा, गुजरात यास पकडण्यास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक त्याचे राहते घराजवळ साफळा रचुन थांबलेले असतांना तो घरात असल्याची माहीती मिळताच पथक त्यास पकडण्यासाठी गेले असता त्याला पोलीस आल्याची चाहूल लागताच तो घरातील AC च्या डक मधुल पाठिमागील बाजूस साडी बांधुन खाली उतरून घरामागील जंगलामध्ये पळुन जाण्याचा प्रयत्न करत असतांना पथकातील अंमलदारांनी त्याचा जंगलातील चिखलामध्ये पाठलाग करून शिताफिने ताब्यात घेतले.

सदरचा मुख्य डिलर राहुल हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर गुतरात राज्यात सोलगड, पार्डी, वलसाड, नवसारी,वलोड,नानापोंडा याठिकाणी प्रोहीबीशनचे ०७ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगीरी नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक,श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती, सहा. पोलीस अधीक्षक, श्री सुरज गुंजाळ यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि/राजु सुर्वे यांचे पथकातील पोउपनि/खाडे, पो.हवा./ दिपक गुंजाळ, शांताराम घुगे, पो.ना./प्रकाश कासार, रमेश चव्हान, देवा गोविंद, नरेंद्र कोळी, तसेच तांत्रीक विश्लेषन विभागाचे पो.ना./प्रदीप बहिरम, हेमंत गिलबिले, भाउसाहेब टिळे अशा पथकाने कामगिरी केलेली आहे.